# कोविड –१९ भरतीप्रक्रिया

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा नाशिक

## Walk in Interview

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नाशिक जिल्हयासाठी **COVID - 19** या साथरोगाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील कोविड रुग्णालयांसाठीच्या कोविड –१९ अंतर्गत DCH / DCHC / CCC रुग्णालयांकरीता कंत्राटी व करार पदध्तीने मानधन तत्वावर आवश्यक मनुष्यबळाकरीता दि.१४/०६/२०२० रोजी दै.पुढारी व www.nrhm.maharashtra.gov.in, http://arogya.maharashtra.gov.in, www.zpnashik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् केलेल्या जाहीरातीनुसार झालेल्या पदभरती दरम्यान रिक्त राहीलेल्या पदांकरीता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे पात्र उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत प्रक्रिया दि.२६/०८/२०२० रोजीपासून पदे पुर्ण भरेपर्यंत दररोज राबविण्यात येणार आहे.

| S. N. | Post Name | Educational Qualification | Salary | Total Post |
|---|---|---|---|---|
| 1 | Physician | MD Medicine | 75000+ performance | 5 |
| 2 | Medical Officer MBBS | MBBS | 60000 | 23 |
| 3 | Medical Officer AYUSH | BAMS / BUMS | 30000 | 114 |
| 4 | Staff Nurse | BSc. Nursing / GNM | 20000 | 174 |
| 5 | Lab Technician | BSc. DMLT from recognized institute | 17000 | 34 |

**अटी व शर्ती:-**

१) इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष अर्जासह **दि.२६/०८/२०२० रोजी पासून दररोज सकाळी १०:०० ते १२.०० वा. या वेळेत शासकीय नर्सिंग कॉलेज तळमजला, जिल्हा रुग्णालय आवार, नाशिक** येथे उपस्थित रहावे.

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

३) सदर भरतीत सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांची प्राधान्यक्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

४) उपरोक्त पदांसाठी उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास COVID - 19 या साथरोगाच्या व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हता धारक शासकीय सेवेतून सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहातील.

५) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून त्यांचा कालावधी ३ महिने अथवा कोविड साथरोग परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत यापैकी नजिकच्या कालावधीकरीता भरण्यात येणार आहे अथवा त्याआधी सदरील पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

६) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. सेवानिवृत एम.बी.बी.एस व विशेषज्ञ वैदयकिय अधिकारी यांना ७० वर्षापर्यंत व इतर सेवानिवृत उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहिल.

७) उमेदवारांनी ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्यासाठी सकाळी १०.०० वा ते दुपारी १.०० वा. पर्यत या कालावधीत उपस्थित उमेदवाराचेच, आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या शेवटच्या वर्षामध्ये मिळालेल्या गुणावरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन त्याचदिवशी नियुक्ती आदेश देणेत येतील.

८) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून COVID-19 या साथरोगाच्या कालावधी साठी असल्याने, साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील COVID-19 उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

९) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

१०) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा व सदरील पदे जाहिरात देवूनही सामाजिक आरक्षणानुसार पुरेसे उमेदवार न मिळाल्यामुळे रिक्त राहिलेली पदे सर्वासाठी खुली राहतिल.

१२) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी.

१३) अर्जदाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व आवश्यक प्रमाणपत्र, सर्व वर्षांचे गुणपत्रके, अनुभव प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्रे (मुळ कागदपत्रे व छायांकित प्रत) सोबत आणावी.

१४) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१५) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ३ दिवसांचे आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१६) पुरेसे उमेदवार न मिळाल्यास ती पदे भरेपर्यंत दररोज ज्याप्रमाणे उमेदवार येतील त्याप्रमाणे Walk-In-Interview पध्दतीने निवड करण्यात येईल.

१७) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी नाशिक व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**स्वाक्षरी/-**
**जिल्हा नोडल अधिकारी(कोरोना) तथा**
**जिल्हा शल्यचिकीत्सक, नाशिक**

# अर्जाचा नमुना

............................या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकीत फोटो |
|---|

प्रति,
**मा. जिल्हा नोडल अधिकारी(कोरोना) तथा**
**जिल्हा शल्यचिकीत्सक, नाशिक**

| १) संपुर्ण नाव | मराठी | इंग्रजी (कॅपीटल लेटर) |
|---|---|---|
| आडनाव | ....................... | ............................. |
| स्वतःचे नाव | ....................... | ............................. |
| वडीलांचे/पतीचे नाव | ....................... | ............................. |
| आईचे नाव | ....................... | ............................. |

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता
पिनकोडसहीत...................................................................................

३) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक१).......................२) .................ई-मेल आयडी............................

४) जन्मतारीख :- / / दि.०१.०८.२०२० रोजीचे वय :- ......वर्षे........दिवस

५) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे गुण | अंतिम वर्षाला मिळालेल्या गुणाप्रमाणे टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

६) अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | |
| | | | |
| | | | |

७) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा. होय ☐ ही ☐

८) Computer Proficiency (MS-CIT) होय ☐ नाही ☐

९) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या असल्यास ✓ अशी खुण करावी.

१) विद्यापिठाचे प्रमाणपत्र ☐ पदवी ☐ पदविका ☐ पदव्युत्तर पदवी ☐

२) शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुणपत्रक ☐

३) अर्ज सामाजिक आरक्षणातून केला असल्यास जातीचे प्रमाणपत्र ☐

४) वयाच्या पुराव्यासाठी प्रमाणपत्र (दहावीची सनद / शाळा सोडल्याचा दाखला/ वयाचा दाखला / आधारकार्ड)

५) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे ? काय होय/नाही

६) कौंसिल कडून चालु कालावधीतील वैद्य व्यवसायीक नोंदणी प्रमाणपत्र ☐

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद् करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

सही/-
नाव..................